# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/जिमस बँक/ठरावा बाबत/ /२०१५/२७१८ दिनांक : २३/ ०२ /२०१५

प्रति,

जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)

विषय :- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीबाबत......

संदर्भ :- ईकडील पत्र जा.क्र.रासनिप्रा/जि.म.सह.बँ./निवडणुक मा.सु./४७४/२०१५ दि.१४/०१/२०१५

राज्यात प्रदीर्घ कालावधीनंतर सहकारी संस्थांच्या निवडणुका सुरु झाल्या आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत फार मोठया संख्येने सहकारी संस्थांचे निवडणुका होत आहेत. या निवडणुका प्रामुख्याने प्राथमिक सहकारी संस्था व संघीय संस्थांच्या होत आहेत.

निवडणुक नियमातील तरतुदी अन्वये संघीय संस्थांच्या सभासद संस्थांचे ठराव हे जिल्हा सहकारी निवडणुक अधिका-याने घ्यावयाचे आहेत. त्याप्रमाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे सभासद संस्थांच्या प्रतिनिधीचे ठराव जिल्हा सहकारी निवडणुक अधिका-याने घ्यावयाची मुदत संपलेली आहे. या पार्श्वभूमीवर ज्या सभासद संस्थांचे प्रतिनिधींचे नांवे ठरावाव्दारे जिल्हा सहकारी निवडणुक अधिका-याकडे प्राप्त झालेली नाहीत, अशा संस्थांचे ठराव घ्यावे किंवा नाही व कोणी घ्यावे या बाबत साशंकता आहे.

राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या धोरणानुसार सहकारी संस्थांच्या निवडणुक भयमुक्त व पारदर्शक पध्दतीने पार पाडणे आवश्यक आहे. तसेच मतदानाची टक्केवारी वाढणेसाठी सभासद संस्था प्रतिनिधीचे ठराव जास्तीत जास्त प्राप्त होणेही आवश्यक आहे. संदर्भिय पत्रान्वये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाच्या समिती निवडणुक प्रक्रियेबाबत अनुसरावयाच्या सर्व साधारण मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

त्यास अनुसरुन सदर पत्रान्वये आपणास कळविणेत येते की, जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती नियम) नियम २०१४ चा नियम १० नुसार ठराव स्विकारण्याच्या निश्चित केलेल्या अंतिम तारखेपर्यंत ठराव दाखल न केलेल्या संस्थांचे ठराव उक्त नमुद निश्चित केलेल्या अंतिम तारखेनंतर प्राप्त झाल्यास असे ठराव प्रारुप मतदार यादी प्रसिध्द होईपर्यंतच्या तारखेपर्यंत नियम १० (३) अन्वये संबंधीत संस्थेने स्विकृत करुन त्याप्रमाणे प्रारुप यादीत समाविष्ट करावे. त्याप्रमाणे आपले स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण,म.रा.पुणे यांचे आदेशानूसार**

सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.